**कृपया प्रसिद्धीसाठी** **13 जुलै 2013**

**देशातील पहिले महिला विद्यापीठ - एसएनडीटीचे केंद्र सरकारला आक्षेपार्ह विस्मरण : राम नाईक**

**मुंबई, शनिवार :**''मुंबईतील गौरवशाली एसएनडीटी महिला विद्यापीठाचे अस्तित्वच केंद्र सरकार नाकारु पाहाते काय?'' असा संतप्त सवाल करीत ''देशातील 'पहिले' महिला विद्यापीठ इंदिरा गांधी यांच्या नावाने रायबरेली येथे स्थापन करण्याची केंद्रिय मंत्री मंडळाने 11 जुलै रोजी केलेली घोषणा ही 2014 च्या निवडणुकीसाठीची संधीसाधुपणाची आहे, इतकेच नव्हे तर ती लाळघोटेपणाची आणि शैक्षणिक इतिहासाबाबतच्या अज्ञानाचे प्रदर्शन करणारी आहे'', अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी मुंबईत प्रसिद्ध केलेल्या निवेदनात व्यक्त केली आहे.

निवेदनात स्वतःची भूमिका स्पष्ट करताना श्री. राम नाईक म्हणतात,'' 2014 च्या निवडणुकांवर डोळा ठेवून काँग्रेस अध्यक्ष श्रीमती सोनिया गांधी यांच्या रायबरेली मतदारसंघात रु. 500 कोटींचे महिला विद्यापीठ सुरु करण्याची केंद्रिय मंत्रीमंडळाची घोषणा संधीसाधुपणाची आहे, हे स्पष्ट आहे. हे देशातील 'पहिले' महिला विद्यापीठ आहे असे मंत्रीमंडळाचे सांगणे संतापजनक, लाळघोटेपणाचे आणि भारताच्या शिक्षण क्षेत्राविषयाचे अज्ञान प्रकट करणारे आहे. भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी शतकपूर्तिकडे जात असलेले देशातील पहिले महिला विद्यापीठ ' दि इंडिअन वुईमेन्स युनिव्हर्सिटी' या नावाने 1916 साली सुरु केले, नंतर त्याचे नाव 1951 मध्ये 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) वुईमेन्स युनिव्हर्सिटी' असे करण्यात येऊन त्याबद्दलचा कायदा बनविण्यात आला. 1939 साली विद्यापीठाचा पदवीदान समारंभ महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली झाला, तर 1941 साली डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली रौप्यमहोत्सव झाला. 1958 साली पंतप्रधान पंडित नेहरु यांच्या हस्ते महर्षि कर्वे यांना भारतरत्न प्रदान करण्यात आले, 1966 साली पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली सुवर्ण महोत्सव साजरा झाला, 1976 साली केंद्रिय दळणवळण मंत्री शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते हीरक महोत्सवानिमित्त टपाल-तिकीट प्रकाशन झाले आणि 1991 साली अमृत महोत्सव संपन्न झाला.'' केवळ भारतातच नव्हे तर जगभर सुप्रसिद्ध असलेले एसएनडीटी महिला विद्यापीठ युनिव्हर्सिटी ग्रँट्स् कमिशनचे माजी अध्यक्ष आणि विद्यमान पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांना माहित नाही असे समजायचे काय? महाराष्ट्राचे 'जाणते राजे' कृषिमंत्री श्री. शरद पवार आणि गृहमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांचेही मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला तेव्हा लक्ष नव्हते की महाराष्ट्राच्या गौरवशाली शैक्षणिक परंपरेचे दिल्लीच्या वातावरणात त्यांनाही विस्मरण झाले आहे?'' असा सवाल श्री. नाईक यांनी केला आहे.

''ज्या एसएनडीटी विद्यापीठाने भारतात स्त्री-शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि स्त्रियांच्या सबलीकरणाचा प्रारंभ केला त्या विद्यापीठाचे काँग्रेस मंत्रीमंडळाला झालेले विस्मरण अत्यंत निषेधार्ह आहे. नियोजित विद्यापीठाला ज्यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे कार्य केले अशा श्रीमती सावित्रीबाई फुले, भगिनी निवेदिता, डॉ.आनंदी जोशी, श्रीमती रमाबाई रानडे यांच्यासारख्या विदुषींचे नाव देणे अधिक समर्पक ठरेल'' असे प्रतिपादनही श्री. नाईक यांनी केले आहे. या संदर्भात पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह व श्रीमती सोनिया गांधी यांना आपण निषेधाचे पत्र पाठविल्याचेही श्री. नाईक यांनी पत्रकाच्या अखेरीस म्हटले आहे.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : मंत्रीमंडळाचे हिंदीतील प्रसिद्धी पत्रक**

**पत्र सूचना कार्यालय**
**भारत सरकार**
**मंत्रिमंडल**

11-जुलाई-2013 15:18 IST

**उत्तर प्रदेश के रायबरेली में इंदिरा गांधी राष्ट्रीय महिला विश्वविद्यालय की स्थापना**

केन्द्रीय मंत्रिमंडल ने उत्तर प्रदेश में महिलाओं के लिए एक राष्ट्रीय विश्वविद्यालय की स्थापना की मंजूरी दी है, जिसका नाम इंदिरा गांधी राष्ट्रीय महिला विश्वविद्यालय होगा। विशेषकर महिलाओं के लिए स्थापित किए जाने वाला यह इस तरह का देश में पहला विश्वविद्यालय होगा। यह विश्वविद्यालय उत्तर प्रदेश के रायबरेली में स्थापित होगा।

एक विधेयक जिसका नाम इंदिरा गांधी राष्ट्रीय महिला विश्वविद्यालय विधेयक-2013 होगा, इसे संसद के आने वाले मॉनसून सत्र में प्रस्तुत किया जाएगा। इस विधेयक के पारित होने के बाद विश्वविद्यालय के स्थापना के लिए कदम उठाए जाएंगे।

12वीं पंचवर्षीय योजना के दौरान इसकी स्थापना में 500 करोड़ रुपये की लागत आएगी।

इस विश्वविद्यालय के जरिए बेहतर रोजगारोन्मुख आधारभूत पाठ्यक्रम और अनुसंधान सुविधा उपलब्ध कराकर देश में महिलाओं के सर्वांगिण विकास के साथ-साथ महिलाओं के सशक्तिकरण में सरकार द्वारा किए जा रहे प्रयासों को बढ़ावा मिलेगा।

देश की कुल 121 करोड़ जनसंख्या में से 58.6 करोड़ महिलाएं हैं जिनमें से 9.5 करोड़ महिलाएं उत्तर प्रदेश में हैं।

***

मीणा/आनन्द/शदीद-4064